# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १५.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १४/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ७६,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**चोरी :—** दिनांक १४/१०/२०२२ रोजी फिर्यादी शिवाजी तुकाराम घुगे रा गाडीपुरा हिंगोली ता जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०७.१०.२०२२ रोजी रात्री २०.३० वा ते २२.०० वा रामलीला मैदानच्या बाजुला असलेली रेणुका बारजवळ सार्वजनीक रोडवर अज्ञात आरोपीने हिरो होंडा कपंनीची काळया रंगाची पॅशन प्रो मोसा क्र एमएच ३८ एल ६६२५ किअ २०,००० रू ची फिर्यादीची मोसा चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

**अपघात :—** दिनांक १४/१०/२०२२ रोजी फिर्यादी राजाराम नारायण घाडगे रा येलदरी कॅम्प ता जिंतुर जि परभणी यांचे फिर्यादी वरून पोस्टे नर्सी ना.येथे कलम २७९,३३७,३३८,४२७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.११.१०.२२ रोजी चे १६:०० वा चे सुमारास मौ गिलोरी फाटयाजवळ रोडवर बोलेरो पिकअप वाहन क्र एमएच ३८ एफ १५१९ च्या चालक नाव गाव माहीत नाही याने त्याचे ताब्यातील वाहन हे भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे टाटा सुमो जिप क्र एमएच ०४ ई एस ८७०८ या वाहनास पाठीमागुन येवुन जोराची धडक दिल्याने फिर्यादीची गाडी पलटी झाली व गाडीतील लोकांना जखमी केले व फिर्यादीच्या गाडीचे रू ७५००० रू चे नुकसान केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात नर्सी ना.पोलीस तपास करित आहेत.

**फसवणुक :—** दिनांक १४/१०/२०२२ रोजी फिर्यादी सुरज नंदलाल सारडा रा मारवाडी गल्ली कळमनुरी ता कळमनुरी यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम ४१९,४२० भादवी सहकलम ६६,६६(डी) आय टि ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१३.१०.२०२२ रोजी १५.३५ वा ते १६.१० वा दरम्यान फिर्यादीचे दुकानात गुजरी चौक कळमनुरी येथे आरोपीतांनी फिर्यादीचे मोबाईल नंबर वर फोन करून फिर्यादीचे क्रेडीट कार्डची सर्व माहीती वेबसाईटवर भरून घेवुन बॅक खात्यातुन एकुन ८४,३४४ रू काढुन घेवुन फसवणुक केली आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत.